IJCRT.ORG ISSN : 2320-2882

INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)

An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# मराठी लेखिकांच्या कथांमधील नातेसंबंधाचे दर्शन

**उन्नती चौधरी**

**संशोधन विद्यार्थी, देशी व परदेशी भाषा विभाग ,छ. संभाजी नगर**

**महाराष्ट्र, भारत**

➤ **सारांश Abstract :**

मानवी जीवनात हळूहळू बदल होत असतांना त्याच्या विकासाच्या अगदी सुरुवातीच्या टप्प्यावर मानवाचे कुटुंब तयार होत गेले. त्याने विकास प्रक्रियेशी संबंधित सामाजिक व सांस्कृतिक जीवन प्रस्थापित केले.प्रथम स्त्रीपुरुष असलेले नंतर ते पतीपत्नी या नात्यात बद्ध झाले. हा नातेसंबंधाचा आरंभ बिंदू म्हणता येईल.त्यांच्यापासून झालेली संतती व त्या संततीचा विस्तार होऊन त्यांच्यापासून जन्माला आलेली मुले या सर्वांना विशिष्ट नात्यांनी संबोधले गेले. त्यात पती, पत्नी, मुलगा, मुलगी, भाऊ, बहीण, काका, काकी, आजी, आजोबा हे रक्त संबंधातील नाते मानले जाते. त्यातील मुलांचे दुसऱ्या कुटुंबातील मुलांशी लग्न झाले की पुन्हा नातेसंबंध निर्माण होतात. आत्या, मामा, सासू, सासरे, साला, साली, व्याही, विहीण अशा अनेक नात्यांची वीण निर्माण झालेली दिसून येते, मात्र प्रत्येकाला त्या त्या नात्याच्या काही आचारविषयक मूल्ये समाजात ठरविले गेले. प्रत्येकाच्या एकमेकांविषयीच्या भावना वेगळ्याच असतात. त्यांचे वर्तन वेगळे असते. अशाप्रकारच्या नात्यांचे मराठी लेखिकानी कसे चित्रण केले, याचे विश्लेषण येथे केलेले आहे.

**प्रस्तावना**

विवाहसंस्थेमुळे कुटुंबव्यवस्था व त्यातून आप्तसमूह निर्माण होतात. त्या समूहातील प्रत्येकांचे एकमेकांशी सांकेतिक नाते ठरलेले असून ते बीज कुटुंब, विस्तारित कुटुंब किंवा संयुक्त कुटुंब यातून नातेसंबंधाची सुरुवात होते. त्यांचे नातेसंबंध संपूर्ण समाजाला व्यापून राहते.त्या त्या समाजातील व्यक्तींचे सामाजिकीकरण करण्याची जबाबदारी ही नात्यातील ज्येष्ठांवर अवलंबून असते. व्यक्तीच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य नातेसंबंधातून केले जाते. त्यामध्ये आई,वडील, मुलगा, मुलगी, आजी, आजोबा असे एकाच कुटुंबातील नात्यातील माणसांना काही समान जबाबदाऱ्या आणि हक्क असतात. त्यांचे परस्परांशी भावनिक संबंध फार जवळचे असतात.यानंतर सासू-सासरे, सून सासू, नणंद दीर, जावई, मामामामी, काकाकाकी व पुतण्यापुतणी, असे कितीतरी नात्यातील माणसे नातीगोती म्हणून एकमेकांशी जोडलेले असतात.मानसिक,भावनिक आणि व्यावहारिक दृष्टीने प्रत्येकाचा प्रत्येकाकडे पाहण्याचा दृष्टिकोण वेगवेगळा असतो. मराठी लेखिकांनी याचे चित्रण कसे केलेले आहे,याची मांडणी प्रस्तुत लेखात केली आहे.

**सुप्रिया अय्यर** यांच्या 'काळीज' कथेतील गरोदर असलेल्या तरूण विवाहितेला डोळ्याने दिसत नाही, म्हणून तिचा नवरा तिला माहेरी आणून सोडतो. तिचे भाऊ आणि त्यांच्या बायका तिची काळजी घेत नाहीत. तिची म्हातारी आई मात्र तिला दवाखान्यात घेऊन येते. तेव्ह लेखिका नातेसंबंधाच्या बाबतीत केवळ मातृप्रेम अस्तित्वात असल्याच सांगतात.नात्यातील माणसे इथे दुखाच्या वेळी आधार देताना दिसत नाही. केवळ आईचा जिव्हाळा तेवढा दिसून येतो. 'बानातला 'न' म्हण' कथेतील मुलाच्या वडिलांचे निधन होते. त्याची आई एका गावात शिक्षिका म्हणून नोकरी करते. डॉक्टर असलेले आजोबा व गृहिणी असलेली आजी हे त्याचे संगोपन करतात. म्हणजेच आईचे आईवडील हे त्यांच्या नातूची काळजी घेतात.'तेरे बिन सुनी रैना' या कथेत पती, पत्नी, मुलगा, मुलगी, आईवडील, भाऊ व बहीण अशा प्रतिमा रेखांकित केलेल्या आहेत. 'सनान रेSS

बोंद्र्या' संग्रहातील 'आठवण एका पार्टीची' कथेत पती-पत्नी, मुलगा आई, सासू-सून अशा नात्याची माणसे असून नवविवाहित सुनेच्या बाबतीत पती आणि सासू दोघेही तिच्याशी चांगले वागत नाहीत. सासू व नवरा यांच्या तुसडेपणामुळे त्यांना झोडपून काढण्याचा विचार त्या सुनेच्या मनात येतो. पण नात्याने तिचा दर्जा कनिष्ठ असल्याने तिच्या फक्त मनात त्यात्यांच्याबाबत उपरोधिक विचार घोळत असतात.

'किनखापी मोर' या संग्रहातील 'सह' कथेतील कावेरीच्या लग्नाला सात-आठ वर्षे होऊनही तिला मूल बाळ होत नाही.तिची सासू संतापी असून श्रीमंतीचा तोरा तिला असतो. आक्का ही तिची आतेसासू मात्र तिला जीव लागते व सांभाळून घेते. तिच्या नवऱ्याच्या म्हणजे केशवच्या दुसऱ्या लग्नाची तयारी सुरू होते. तेव्हा ती कावेरीची बाजू घेऊन लग्नाला विरोध करते.आणि 'अजून कुठं वय झालंय तिचं? लहानच तर आहे. होईल मूल तिला." असे तिच्या सासुला सांगते. तिच्या धाकट्या जावांना मुली, मुलं होतात. कावेरी जावांच्या शंतनू व निरंजन या मुलांना सांभाळते. सारे घराकामाचे कष्टही करीतच राहते. लहान जावां कानकोंडी होतात.त्या तिचे कौतुक तर करीत नाहीच,उलट त्यांना तिचा राग येतो.तिच्याबद्दल वाईट बोलतात.ती सर्वांशी मवाळ व प्रेमाने वागते. जावांची मुलं सांभाळते. मोठेपणी ती मुले तिच्या उपकाराची जाणीव ठेवत नाहीत. तिला तिचे पुतणे हे पक्के व्यवहारी वाटतात.

'मोला छोड दे अम्मा' या कथेत आई, वडील, मुलगा, मुलगी, भाऊ व बहिणी अशा एकाच कुटुंबातील नात्याच्या प्रतिमा रेखांकित केलेल्या आहेत.वडील दारू पिऊन आईला मारझोड करतात आणि घरामध्ये धिंगाणा घालतात. त्यामुळे मुलगा वैतागून जातो आणि तो त्याच्या वडिलांचा खून करतो.'किनपाखी मोर' या कथेत आप्पा, त्याची पत्नी माई आणि त्याची पाच मुलं अशा या कुटुंबात रमा ही बालविधवा आप्पाची बहीण असून त्याच्याकडे राहते, परंतु तिची वहिनी तिच्याकडून घरातील सारी कामे करून घेते आणि घरातील व्यवहार स्वतःकडे ठेवते. तिच्या हातात पैसे, सोन्याचांदीचे व्यवहार असतात आणि रमा मात्र घरातील कामं करीत असते. सारं करूनही तिची कशावर सत्ता नसते. यातून नातेसंबंधातील कोरडेपणा व स्वार्थीपणा स्पष्ट होतो.

'निरभ्र' कथेतील अमृता पतीच्या निधनानंतर एकटी पडते.भाऊ व वहिनी तिच्याकडे येऊन कोरडी सहानुभूती दाखवितात.भाऊबहीण तिला आधार देत नाहीत.ती मुलीच्या सहवासात तिचे दुःख विसरून जाते व स्वतःला नोकरीच्या कामात गुंतवून घेते. " आयुष्य उद्ध्वस्त करणारी लढाई असली तरी ती त्याक्षणी निर्णायक असावी. निदान उरलेल्या आयुष्यावर तरी आपली सत्ता असते." असा विचार करून ती स्वतःचे अस्तित्व जपत असते.'हरवल्या दिशा' कथेत नंदिनीची आई नातेवाईकांचे पैसे, दागिने चोरत असल्याने ते तिच्याकडे येणे बंद करतात. तिचे काका, आत्या त्यांच्याकडे येत नाहीत. तिच्या चोरीला वडिलांचाही पाठींबा असतो. हे पाहून नंदिनीला त्रास होतो. ती आत्महत्येचा विचार करते. आईवडील वाईट म्हणून बदनाम झालेले असतात.अशा घरातून मुक्त होण्यासाठी तिची बहीण मुक्ता पळून जाऊन परधर्मीय प्राध्यापकाशी लग्न करते.तर नंदिनीची आत्या तिचं लग्न ठरवते. तिला ते स्थळ पसंत नसतानाही ती होकार देते. तिच्या सासरी तिची आई येते. तिच्या आईचं येणं तिच्या नवऱ्याला आवडत नाही, म्हणून तो नंदिनीशी बोलत नाही. मुलीचं, जावयाचं, नातवाचं असं परक्यासारखं वागणं पाहून तिची आई परत जायचं ठरवते.

'मुक्तियात्रा' कथेतील उषाताईचा नवरा हा फक्त भाऊ, बहीण व त्यांची मुलं यांचाच विचार करतो. पत्नीला विचारात घेत नाही. ती पुतण्याला शिक्षणासाठी तिच्याकडे ठेवते, परंतु त्याच्या बिघडलेपणाचा आणि अपयशाचा दोष तिचे नातेवाईक तिलाच देतात. तिचा झालेला हा अपमान ताजा असतानाच तिची वहिनी नलिनी तिच्या मुलीला गर्भपात करून घेण्यासाठी तिच्याकडे घेऊन येते व तिची जबाबदारी घ्यायला आग्रह करते.रागिणीला तिच्याकडे ठेवून घेते, पण पंधरा वर्षाची रागिणी □बोशनमुळे अत्यावस्थ होऊन मरते. नातेवाईक तिलाच दोष देतात. तरीही उषाताई सहन करते,परंतु मनाने खचून जाते. सेवानिवृत्तीनंतर दत्तोपंत व उषाताई भाड्याच्या घरात राहतात. त्यांचा पुतण्या शशांक,त्याची पत्नी व मुलासह त्यांची काळजी घेत नाही.शेवटी दोघे म्हातारा म्हातारी त्यांच्या लग्नाच्या पन्नासाव्या वाढदिवसाच्या एकदिवस आधी गावाबाहेर जाऊन ते आत्महत्या करतात.

**आशिरगडे माधुरी** यांच्या 'आई शप्पथ' कथेत वडील, मुलगी, आई व मुलगी या नात्यांचे रेखांकन केलेले आहे. मुलीला गाण्याच वेड असल्याने तिचे आईवडिल गाण्याच्या क्लासला जाण्याची परवानगी देतात. एका गायकाशी तिची मैत्री झाल्यानंतर रुढी परंपरेन लग्न करायचं ठरवते, परंतु गायक जावई नको म्हणून तिचे वडील दुसऱ्याच एका श्रीमंत बिजवर माणसाशी लग्न ठरवतात.तिला मुलगी होते. देवकीच्या नवऱ्याचे आणि वडिलांचे निधन झाल्यानंतर मायलेकीच्या वाट्याला वैधव्य येते. 'गुंता' कथेतील सुमती भरत नावाच्या तरूणाशी प्रेमविवाह करते. मुलाने आपल्या पसंतीचे लग्न केले नाही म्हणून तिची सासू तिचा राग धरते. तिच्या लहान मुलीला तिची सासू सांभाळत नाही, म्हणून तिला बोर्डिंगमध्ये ठेवते. 'सुनेने दुसरं लग्न केल्यानंतर आपण एकटे पडू' या विचाराने तिच्या सासूचा मानसिक तोल जातो. ती आक्रमक बनते. तेव्हा पुनर्विवाह न करता ती सासूच्या तब्बेतीची जबाबदारी घेऊन तिला स्वास्थ मिळण्यासाठी धडपडते.

'मन वढायं वढायं' या कथेतील शिक्षक म्हणून एका शाळेतून सेवानिवृत्त झालेले अपराचे वडील तिला तिच्या आवडीप्रमाणे शिक्षण घेऊ न देता बी.एस्सी. झाल्यानंतर घाईघाईत तिचे लग्न उरकून टाकतात. अशा परंपरावादी वडिलांमुळे तिला तिच्या मनासारखे आयुष्य जगता येत नाही, नंतर तिच्या वाट्याला एकतीसाव्या वर्षी वैधव्य येते. मानस हा तिच्या मोठ्या सावत्र नणंदेचा मुलगा तिच्यापेक्षा आठ वर्षांनी लहान असतो. शिक्षणासाठी तो तिच्याकडेच राहतो. त्यावेळी दोघांना एकमेकांविषयी शारीरिक व लैंगिक आकर्षण वाटते, तो तिच्याशी लग्न करण्याचा विचार करतो, त्यावेळी ती समाजातील अशा नातेसंबंधाच्या बाबतीत भान राखून त्याच्याशी लग्न करीत नाही, तर वैधव्याच्या दहा अकरा वर्षांनंतर एवढा कालावधी लोटूनही अपरा एका त्रिपूत्रीक विधुराशी लग्न करायचे ठरवते. 'वारिणी' कथेतील वारिणीच्या नवऱ्यामध्ये पौरूत्वाचा दोष असल्याने तिला मुलबाळ होत नाही. त्याशिवाय जगणं तिला उदासवाणे वाटते. चिडचिड करून सासूला त्रास देते. तिच्या पतीमध्ये दोष असल्याने तिची सासू व तिचा नवरा तिला सहन करताना दिसतात. 'मनाची गुंथी' कथेतील वरिष्ठ महाविद्यालयातील नेने सरांना दोन मुलं व सुविद्य पत्नी असून त्यांची विद्यार्थिनी राही हिला त्यांच्याबद्दल आकर्षण वाटून त्याच्यावर जीवही जडतो. त्यांच्या सहवासात राहण्यासाठी ती सरांचा मुलगा निलयसही लग्न करते.एकदा दोघंही घरात एकटे असल्याने सर रतिसुखाच्या अधीरतेने राहीचा हात पकडून इच्छा व्यक्त करतात. त्यावेळी ती प्रतिकार करून आत्महत्या करते. 'पराभूत' कथेतील शालिन कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडून मोहक या तिच्या मुलाचे संगोपन आणि शिक्षण याकडे काळजीपूर्वक लक्ष देते.नंतर तिला निवांत आणि मोकळा वेळ मिळाल्याने ती जुने छंद गोळा करून त्यात आपला वेळ घालविते. मात्र आई आपल्यापासून दुरावत असल्याची भावना त्याच्या मनात निर्माण होते, त्यातून तो आत्महत्येचा प्रयत्न करतो. परिणामी एकीकडे मुलाची नाराजी आणि दुसरीकडे समजून न घेणारा अलिप्त असणारा पती याने शालिनचा मानसिक तोल ढासळतो. 'एक सत्य करपलेलं' या कथेत पती व पत्नी, दीर व वहिनी, जावाजावा, असे नातेसंबंध असून नवरा व जावू यांच्यातील लैंगिक संबंधामुळे नवऱ्याला सोडून देणाऱ्या विवाहितेची प्रतिमा साकार झालेली आहे. 'अनुनय स्व चा' कथेतील इंद्रायणी लग्न होऊन सासरी येते तर तिच्या थोरल्या नणंदकडून तिला तुसडेपणाची वागणूक मिळते. सासू, नणंद आणि मोठी जाऊ यांच्याकडून तिला आपुलकीने वागविले जात नाही. अवमान व अवहेलना झाली तरी ती आपला संसार रेटून नेते.

**इंगोले प्रतिमा** यांच्या 'जिवती' कथेत गीताईच्या लग्नाला चारपाच वर्षे होऊनही तिला मूलबाळ होत नाही.तिची सासू नातू होण्याची वाट पाहते. तिचा नवरा तिच्या भावाला बोलवून तिला घेऊन जायला सांगतो. तो तिच्या घरी आल्यानंतर तिला विचारतो,ती त्याला परत पाठवून देते.भाऊ-बहीण,पतीपत्नी व सासूसून या नात्यांमधील परस्परांचे एकमेकांकडे पाहण्याचे दृष्टिकोण यातून प्रकट होतात. 'दूधमाय' कथेतील बापूजीच्या लग्नाला बारा वर्षे होऊनही त्याला मूलबाळ होत नाही,म्हणून त्याचे कुटुंब पहिल्या बालविवाहाच्या पत्नीला आणतात, तिला मूलं होतात,परंतु तिची सवत तिची काळजी घेत नाही. बाळंतपणाने ती खंगून आजारी पडते. त्यात तिचे निधन होते. तेव्हा तिला पाच महिन्याचा धाकटा मुलगा असतो. त्या लेकरांची सावत्र आई बापूजीची पहिली निपुत्रिक पत्नी मुलाची काळजी घेत नाही. त्या लहान मुलाचे आजाराने निधन होते. अशाप्रकारे दुष्प्रवृत्तीच्या सवतीची वाईट प्रतिमा डोळ्यासमोर उभी राहते. 'मायचा आकांत' कथेतील वंदनाचे वडील शेती विकून हुंडा देऊन तिचे लग्न करतात. तिला दोन मुली जन्माला येतात.नंतर मुलगा हवा म्हणून तिच्या नवऱ्याचा व सासूचा आग्रह असल्याने ती चिंतेत असते. तिचा नवरा तिसरी मुलगी झाल्यास तो दुसरे लग्न करण्याची धमकी देतो. तिला सासरी कोणी समजून घेत नाही. तिसऱ्या बाळंतपणाच्यावेळी तिच्याकडे दुर्लक्ष करतो, पण एकाच वेळी मुलगी व मुलगा हे जुळे मुलं

तिला होतात. तेव्हा तिच्या सासुला व पतीला बरे वाटते. 'अनावर' कथेतील विवाहितेला मातृत्वाची ओढ लागून असते. तिच्या सासूबाईंना तिघी बहिणी असतात,म्हणून तिघींनाही नातवाची आतुरता असते. तिला आपुऱ्या दिवसाचा मुलगा होऊन त्याची वाढ मंदगतीने होते,आईवडीलही त्याचा राग करतात.

**मोहना कारखानीस** यांच्या 'अन्नपूर्णा' या कथेतील विधवा जानकी खोली मालकीणच्या आश्रयाने खानावळ सुरू करते. गिऱ्हाईकांना चांगले जेवण देत असल्यामुळे तिच्या खानावळीचा व्याप वाढतो. त्यातच ती मुलांचे संगोपन व शिक्षण चांगल्या पद्धतीने करते. तिचा मोठा मुलगा डॉक्टर होतो. मुलगी फार्मसीमध्ये मोठ्या हुद्यावर नोकरी करते. आईने आता कष्ट व धावपळ न करता आपल्याकडे आरामशीर राहावे, असे ते त्यांच्या आईला सांगतात. पण मातृनिवास व अन्नपूर्णा यांच्याशिवाय जगणे तिला अशक्य वाटते.खानावळ टिकेल की नाही म्हणून ती पुन्हा दुखी होते. लहान मुलगा मनीष तिला धीर देतो. 'पाहू नकोस मागे' कथेतील शर्वरी गरोदर राहिल्यानंतर तिला न विचारताच सासरचे लोक तिच्या गर्भलिंग परीक्षणाचा निर्णय तिच्यावर लादला जातो. मुलगी असल्याचे कळल्यावर सासरचे लोक तिला गर्भपात करायला सांगतात.ती ऐकत नाही. तिने घेतलेला निर्णय अमलात आणण्यासाठी तिला आपल्याच माणसांशी संघर्ष करावा लागतो. काही काळ माहेरी राहते.

शर्वरीला मुलगी म्हणून तिला व तिच्या मुलीला पती,सासूसासरे,दीर ही जवळच्या नात्यातील माणसे मायलेकीची उपेक्षा करतात आणि तिच्या दिराला मुलं जन्माला आले म्हणून त्या मुलांना चांगली वागणूक देतात.पण त्यांच्यापासून तिच्या सासू,सासरे व पतीला त्रास होतो.तेव्हा मुलांपेक्षा मुलगी चांगली.अशी मांडणी लेखिका करतात. 'दोन आज्यांची गोष्ट' या कथेतील सुंदराबाईला तिची सून प्रेमाने व जिव्हाळयाने वागवीत असल्याने ती मनोमन फार समाधानी असते, म्हणून ती तिच्या सुखद भावना व्यक्त करते. 'मॉल' या कथेत आई-वडील आणि अल्पवयीन बालमजुरी करणारे भाऊ बहीण यांच्या नातेसंबंधातील भावनिक पीळ लेखिकेने उलघडून दाखविलेला आहे.मुलांचे व्यवस्थित संगोपन न करणाऱ्या बेफिकीर, व्यसनी व वाईट वागणाऱ्या वडिलांचे चित्रण करताना लेखिकेने भाऊबहीण यांचे कोवळे मन व त्यांच्या एकमेकांविषयी असलेल्या प्रेमळ भावना प्रकट केलेल्या आहेत. 'पैंजण' कथेतील नमूची आई लोकांकडे धुण्याभांड्याचे काम करते. अल्पवयीन नमू तिच्या कौटुंबिक परिस्थितीविषयी विचार करते. तिला आईची खूप काळजी वाटते. मात्र तिला तिच्या आळशी, बेफिकीर आणि व्यसनी असलेल्या सावत्र वडिलांचा तिरस्कारही वाटतो.ती भावंडांची पोटे भरण्यासाठी आईला मदत करू लागते.

'अलविदा' कथेतील करूणाच्या आईचे निधन झाल्यानंतर तिचे वडील चांगल्यापद्धतीने संगोपन करतात. ती शिकून नोकरी करते. रिकाम्या वेळेत काव्यनिर्मिती करते. तन्मयशी लग्न करण्याचा विचार वडिलांकडे बोलून दाखवते, मात्र घाई न करता त्याला गुणदोषासह समजून मग लग्न करावं, असं ते सूचवतात, परंतु ती काही ऐकत नाही. लग्नानंतर ती नोकरी सोडते.तेव्हा आईचे प्रेम देणारा बाप,त्याचे न ऐकणारी मुलगी, वाईट वागणारा पती,अशा नातेसंबंधाचे पीळ लेखिकेने उकलून दाखविले आहे. 'डाग चंद्रावरचा' या कथेत आई व मुलगा या नात्याकडे परंपरागत पद्धतीने न पाहता दोघेही मनमोकळे आणि मित्रत्वाच्या भावनेने एकमेकांना समजून घेतात. मुलाचा प्रेमविवाह होण्यास आई सकारात्मक प्रतिसाद देते. 'जन्मदाता' कथेतील विनय वडील घर विकून पैसे देत नाही म्हणून त्यांच्याशी तुसडेपणाने वागतो. सूनबाई खाण्याची सोय ठेवत नाही. मुलगा व सून घालूनपाडून बोलतात. म्हातारपणात असे बोलणे ऐकून त्यांचे मन दुखावते. एकूणच आई, वडील, मुलगा, पती-पत्नी, सासरे व सून या नातेसंबंधाचे भावबंध उलगडून दाखविताना तरुण पिढी पतीपत्नी म्हणून स्वतःच्या सुखोपभोगासाठी नातेसंबंध विसरून घरातील म्हाताऱ्यांना अडगळ व निरूपयोग समजतात. त्यांना ते नकोसे वाटतात.

**सुनिता कावळे** यांच्या 'मन' कथेतील नोकरी करणारी सरू ही घर सांभाळून नवऱ्याला उच्च शिक्षण घेण्यास प्रोत्साहन देते. त्याला शिकविते,पण तो चांगल्या नोकरीला लागल्यानंतर परस्त्रीच्या नादी लागतो . तिची नणंद तिच्या चारित्र्याबाबत टाकून बोलते.ती घर सोडून माहेरी जाते. तेव्हा तिच्या नणंदेचा नवरा तिला समजावून सांगतो. 'ब्याद' कथेतील दादा हा काहीही कामधंदा न करता दारूचे व्यसन करतो. वहिणीला त्रास देतो. अशावेळी तिला माहेरचाही आधार मिळत नाही. तिची वहिनीही तिला आधार देत नसल्याने ती माहेराला परकी होते. शेवटी दारूड्या नवऱ्याला सोडून मुलांना घेऊन ती मातृसेवा संघाच्या आश्रमात राहते व नोकरीही करते. 'उसवलेलं आभाळ' कथेत चौदा-पंधरा वर्षाच्या शकूला कुष्ठरोग होतो. आईवडील तिला त्यांच्यापासून दूर ठेवत नाहीत. मात्र हाच जावई पत्नीच्या बाळंतपणानंतर तिला घरकाम करण्यासाठी स्वतःच्या घरी घेऊन जातो.तिच्याशी लैंगिक संबंध ठेवल्याने ती गरोदर राहते. तो तिला तिच्या आईवडीलांकडे पाठवून देतो आणि त्यांना धमकी देतो.'आधारवड' या कथेतील तरुण विधवा नोकरी करून व शिकवण्या घेऊन मुलांचे शिक्षण व संगोपन व्यवस्थित

करते. ती स्वावलंबी असल्याने कोणाच्या मदतीची तिला गरज नसते. मात्र तो तिच्या सासरच्या मंडळीला स्वतःचा पराभव वाटतो. तिची नणंद तिला नावे ठेवते. तिच्या दूरच्या नात्यातील मामी तिला आधार देते आणि आणि जगणे शिकवते.

**आशा बगे** यांच्या 'चंदन' कथेतील मुकुंद आणि त्याचे वडील वकील साहेब यांच्यामध्ये एकमेकांविषयी समजून घेणेबाबतचे एक विचार, एक मत नसते. मुलाने आपल्यासारखेच वकिली व्यवसाय करून प्रसिद्ध व प्रतिष्ठित बनवावे, असे त्यांना वाटते, परंतु मुकुंद त्याच्या आवडीप्रमाणे महाविद्यालयात प्राध्यापकाची नोकरी करतो. त्याचे साधे सरळ वागणे त्याच्या वडिलांना आवडत नाही. मृत्यूसमयी "मुकुंद, मला तुझी काळजी वाटते" असे त्याचे वडील त्याला सांगतात.शेवटी बापाला आपली काळजी होती, याची खात्री त्याला पटते.

'श्राद्ध' कथेत मुलांनी वडिलांचं वर्षश्राद्ध करावं, असे सुमनताईला वाटते, परंतु तिचे मुलं, सुना यांना मात्र वर्षश्राद्धविषयी काही विशेष वाटत नाही. तिची सून संजीवनी ही तिला समजून घेते आणि "आपल्या माणसांच्या भावना दुखावू नये", म्हणून सुधीरला अर्थात तिच्या नवऱ्याला वर्षश्राद्ध करायला सांगते.'एक पावसाळी संध्याकाळ' या कथेत आईवडील, मुलगामुलगी व भाऊबहीण, अशा नातेसंबंधाचे चित्रण केलेले असून प्रत्येक जण आपापल्या तालामध्ये आत्मरत झालेला दिसतो. कोणी कोणाच्या मनाचा व भावनांचा विचार करताना दिसत नाही. केवळ एकमेकांकडून अपेक्षा केलेली असते. त्यामुळे उच्चशिक्षित तरुण मुलगा हा आई-वडिलांच्या पुढे स्वतःला कमी समजतो आणि त्याच्यात न्यूनगंड निर्माण होतो,त्यामुळे त्याचा जो मानसिक समतोल बिघडतो त्याला त्याचे आई वडील कारणीभूत ठरतात. दूरच्या नात्यातील सुमित्रा गुणवंतला मदत म्हणून त्याच्या वेडसर मुलाला सांभाळते आणि ठीकही करते. 'वर्तमान' या कथेत आईवडील,मुले,भाऊभाऊ,बहीणभाऊ,अशा नात्यांची गुंफण केलेली आहे. अभिरामने नोकरीची वाट पाहण्यापेक्षा कापडगिरणीत काम करावं, असे त्याच्या भावाला वाटते आणि 'साधं बी.एस्सी, बी.एड्. केलं असतं तर आमच्या शाळेत लावून दिलं असतं', असे वडील म्हणतात.त्यांचा अभिरामला राग येतो. आईला मात्र त्याच्या मनाची घालमेल तेवढी कळते.त्याला समजून घेते.

**कुमुद मंडलेकर** यांच्या 'हुलकावणी' कथेतील सईला तिच्या लग्नाच्या आठव्या दिवसापासून तिची सासू तिला धुन्याभांड्याच्या कामाला सोबत यायचं सांगते.टाकून बोलते. पितृसत्ताक कुटुंब पद्धतीमध्ये सासरकडील नातेसंबंधातील माणसांच्या शब्दाबाहेर विवाहितेला जाता येत नाही. तिला दुय्यम स्थान दिलं जातं आणि केवळ कामाचे साधन म्हणून तिच्याकडे पाहिले जाते. 'दान-पुण्य' या कथेतील सरूचे आईवडिल तिला शिकू देत नाही.कारण 'तरणीताठी पोर आपल्या जवळ ठेवणं म्हणजे जळतं कोलीतच' ही तिच्या वडिलांची भावना असते, म्हणून तिचे वयाच्या अकराव्या वर्षीच लग्न करून टाकले जाते. सासरी तिला राबवून घेतलं जातं आणि वरतून तिचा छळही केला जातो. मुलीला झालेला त्रास पाहून वडिलांच्या डोळयात पाणी येते. ते तिच्या पाठीला आंबेहळदीचा लेप लावून देतात आणि सासरी न पाठवता तिला शाळा शिकविण्याचा निर्धार करतात. 'तवंग' या कथेत आईवडील, सात भावंडे, आजी, आजोबा व काका अशा नातेसंबंधातील माणसांचे चित्रण केले आहे. 'क्लिअरन्स' या कथेतील नैना नोकरीला लागल्यानंतर तिच्या लग्नाच्या बाबतीत तिचे आई-वडील घाई करतात,परंतु तिची उंची कमी असल्यामुळे येणारे स्थळं तिला नाकारतात. शिवाय घरातील आईवडिलांचे भांडण पाहून तिला लग्न करावेसे वाटत नाही. 'दृढवती' कथेतील तरुणी आई व भाऊच्या विरोधात जाऊन प्रेमविवाह करते. त्यावेळी तिची बहीण तिला आधार देते. चार बहिणी, तीन भाऊ अशा कुटुंबात ती सर्वात लहान म्हणून लाडात वाढलेली असते.घराण्याची प्रतिष्ठा घालविली म्हणून तिचा भाऊ तिला रागवतो. तिच्या माहेरची माणसं दुरावतात. तिचा नवरा नंतर तिच्याशी चांगला वागत नाही. त्यामुळे तिला माहेर आणि पतीचे घर दोन्हीही परकी होतात. शेवटी ती आत्मनिर्भर बनून स्वतःची ओळख निर्माण करते आणि स्त्रीमुक्ती चळवळीत काम करते. 'आसरा' कथेतील विधवा सीमा दोन मुली, सासू ,परितक्त्या नणंद यांच्या जबाबदाऱ्या स्वीकारते. तिच्या सासूला तिचीच काळजी वाटू लागते. तर सीमा नवऱ्याचं दुःख बाजूला ठेवून सासूला धीर देते व सांत्वन करते.

'उपरी' कथेतील शांताबाईच्या जीवनात आयुष्याच्या अखेरपर्यंत राबणं येत. लहानपणी बाप शिकू देत नाही. घरी कामे करावी लागतात. बापाचा मार खाऊन त्याच्या धाकात राहावे लागते. लग्नानंतर सासुरवास आणि म्हातारपणी सुनेचा त्रास म्हणून आयुष्याच्या शेवटपर्यंत माहेर व सासर अशा दोन्हीकडील नात्यांमुळे चिंता, दुःख व नैराश्यच तिच्या वाट्याला येते. 'अवसान' कथेतील जयंतच्या आईचे निधन होते.त्यानंतर त्याची काकू त्याचे व त्याच्या भावाचे प्रेमळपणे व मायेने संगोपन

करते. नंतर तो नोकरी लागतो. जया नावाच्या नोकरी करणाऱ्या एका संसारी तरुणीशी त्याचे लग्न होते, परंतु काही वर्षानेच तिचे निधन झाल्याने त्याला पोरकेपण वाटते. पत्नीच्या निधनानंतर तो मुलांवर मातृवत प्रेम करून त्यांचे पालनपोषण करतो. 'याच देही...' कथेतील माधव एका मुलाच्या अपघाती निधनाला स्वतः जबाबदार समजून खचून जातो. पक्षघाताने त्याचे शरीर लुळे पडते. पत्नी चिडचिड करते. मुलगी उलटून बोलते. नोकरीवर असलेला आनंद नावाचा मुलगा तेवढ्यापुरता त्यांच्याकडे पाहतो, पण त्यांच्यात रमत नाही. तेव्हा त्यांना आपल्याच माणसांकडून एकाकीपणाची व तुटलेपणाची जाणीव होते. 'उगवती' पायवाट या कथेतील शोना तिच्या मावशीकडे राहते. तिची मावशी व काका यांना नातेवाईकांविषयी फार लोभ असल्याने दोघेही नातेगोते सांभाळतात. शोनाच्या आजीला तिचे मामा शेतीसाठी घराबाहेर काढून मुलीकडे पाठवतात. शोनाच्या आईच्या संसाराला हातभार लावणं, तिला मदत करणं हे सारे तिच्या मावशीने व काकाने केलेले असते. नंतर शोनाच्या काकाचे (बाबा) निधन होते. सुशीला ही शोनाची मावस बहीण व बाबाचे पुतणे येतात. ते रडण्याचा कांगावा करतात. काकाच्या मुलीला घर संपतीतून बेदखल करतात.कोणालाच बाबाच्या मरणाचे काही वाटत नाही. तेव्हा लेखिका नातेसंबंधातील माणसाच्या स्वार्थीपणाचा कळस यातून लक्षात आणून देतात.

'पडसाद' या कथेतील रेवती एकत्र कुटुंबामध्ये सर्वांशी प्रेमाने वागते. घर काम करते. आल्यागेल्यांवर नातेवाईकांवर तिचा फार जीव असतो. प्रेमाने नात्यातील अनेक माणसे तिने जोडलेले असतात. त्यामुळे तीच्या चांगुलपणामुळे तिचा एक गोतावळा निर्माण होतो, याची जाणीव तिचा पती अशोकला तिच्या आजरपणाच्या वेळी होते.तर तिच्या आजारपणाला तिचा मुलगा कंटाळतो.'कढ' कथेतील मुलगी, सावत्र आई, वडील, भाऊ, बहीण, अशा कुटुंबात वडील मुलीला तिच्या इच्छेप्रमाणे शिक्षण घेऊ देत नाही. भावांची जबाबदारी सांभाळायला सांगतो. तरी ती मुलगी माया साधे शिक्षण घेऊन नोकरी करते. शेवटपर्यंत लग्न न करता भावांचा आधार बनते, परंतु भाऊ मोठे होऊन स्वतःच्या संसारात रमून . स्वार्थापुरता बहिणीशी संपर्क ठेवतो. ती सर्वांची असते,पण तिचे तिला कोणीच होत नाही,भाऊ व बहीण केवळ फायद्यापुरते तिच्याकडे पाहतात. 'बायपास' कथेतील नानाच्या शस्त्रक्रियेसाठी पैशाची गरज असते. ते चिडचिड करतात. त्यांच्या पदवीधर मुलाला राग येतो.त्याची आई त्याला समजून सांगते. नानाचा लहान भाऊ आत्महत्या करतो. त्याची विधवा पत्नी, लहान मुलगा यांना निराधार करून शस्त्रक्रियेसाठी शेती विकू नये असं नानाला वाटतं.नानाची पत्नी दागिने विकून नानाचं बायपास सर्जरीचं ऑपरेशन पुन्हा करून घेते. एकूणच आपल्या माणसाला जपणारी माणसे इथे दिसतात. 'संक्रमण' कथेतील विमलबाईला म्हातारपणी स्वतःच्या घरातच परकेपणा वाटतो. सून तिच्या भावना व गरजा समजून घेत नाही. नवऱ्याचा पगार घरात खर्च करत न करता बँकेत टाकते. सासऱ्याच्या पेन्शनमध्ये घर खर्च भागवते. सासूला तिच्या गाण्याची आवड म्हणून पेटी वाजवू देत नाही. आयुष्याच्या शेवटी तरी स्वतंत्र जगावं असं तिला वाटते, पण लहानपणी वडिलांचे व म्हातारपणी सुनेचे बंधन, यात तिच्या मनासारखे तिला राहता येत नाही.

'प्रत्यय' कथेतील कल्याणी , तिची विधवा आई व तीन बहिणी आहेत. तिचा मामा तिचं लग्न करून देतो. तिची सासू भांडखोर, नणंद कळ लावणारी तर नवरा मारझोड करणारा,अशी ही सासरच्या नात्यातील माणसे आहेत.त्यांच्या वाईट वागण्याने तिच्या आयुष्यात कटकटी वाढत जातात. ती घर सोडून तिच्या आईकडे जाते. ती नर्सिंग कोर्सला प्रवेश घेते. एका दुकानात पार्टटाईम नोकरी करते. तिचा नवरा रमेश दारूमुळे मरण पावतो. तिची सासू तिला तिच्याकडे राहायला सांगते. ती राहत नाही, पण तिचा मुलगा आजीकडे राहतो, म्हणून आग्रह धरतो आणि आजीकडे राहतो. पेन्शनमधील आनंदच्या खर्चासाठी पैसे पाठवायचे, असे तिची सासू तिला सांगते. सासूचे डावपेच तिच्या लक्षात येतात.

**मोहना मार्डीकर** यांच्या 'स्वप्नातल्या कळयांनो' कथेतील मुलगा लग्नानंतर आईवडिलांपेक्षा सासरच्या नात्याकडे अधिक झुकलेला असतो.मुलीला मात्र आईवडिलांचा लळा लागलेला असतो. असे रक्तसंबंधातील परस्पर विरोधी भावना असणारे नाते,येथे प्रकट झालेले आहे. 'मी माझीच' कथेतील सुलक्षणा प्रेमविवाह करते,पण तिचा संसार सुरळीत चाललेला असताना तिचा नवरा घटस्फोटीत व एका मुलाची आई असलेल्या तरुणीच्या प्रेमात पडतो. सुलक्षणाला घटस्फोट देऊन तिच्याशी लग्न करायचं म्हणतो. तेव्हा ती माहेरी येते. तिचे वडील तिला धीर देतात आणि भाऊही तिला हिम्मत देतो. रीतसर तिचा घटस्फोट होतो. कॉलेजमध्ये तिची नोकरी चालू राहते. 'देवकी' कथेत विधवा रेवतीचे दुःख सासू-सासऱ्यांकडून पाहवत नाही. तिचा पुनर्विवाह करून देतात.सुनेच्या भविष्याची चिंता करणारे सासूसासरे व तिच्याशी मायेने वागणारे दीर व जाऊ या नात्याच्या उदात्त प्रतिमा डोळयासमोर उभ्या राहतात.

'कशी करू स्वागत!'शिक्षित पदवीधर गृहिणी घरातील सारी कामे करता करताच थकून जाते.बाहेर गावी नोकरीला असलेला तिचा नवरा घरी येतो,तेव्हा त्याला भेटायला त्याचे आईवडील, बहिणी, त्यांची मुले येतात. त्या साऱ्यांची ती सोय करते. त्यांची अडचण सहन करते. तिच्या नंदा कामाला हात लावत नाही. कारण वहिणीसमोर कामं न करणे हा रिवाज असल्याने सगळा कामाचा भार तिच्यावर पडतो. एकूणच वहिनी आणि नणंद यांच्या नात्यातील संकेत व नणंदांची मानसिकता यातून प्रकट होते. 'माया'कथेतील सुनिताचा नवरा तिच्या बहिणीकडे आकर्षित होतो. तिला मुलबाळ होत नसल्याचे निमित्त साधून सालीशी लग्न करतो.दोघी बहिणी सवती बनतात. ती नवऱ्याला घटस्फोट न देता त्या लग्नाचा स्वीकार करते. दुसऱ्यांकडे मोलकरीण म्हणून काम करून स्वावलंबी जगणं असूनही ती नवऱ्याचे वाईट वागणे सहन करते.

**वानखेडे सुमती** यांच्या 'म्हटलं नव्हतं मी तुला!' या कथेत पती-पत्नी, आई-मुलगी, सासु-सून, वहिणी-वहिणी अशा नातेसंबंधाचे दर्शन घडते. या सगळया नातेसंबंधामध्ये तन्मयी या विवाहित तरूणीची घुसमट होते. आईदेखील तिच्या विवाहानंतर 'दिली तिकडे मेली' या भावनेने तिच्याकडे पाहते.सासरी नवऱ्याचा त्रास सहन करता करता नवऱ्याच्या नात्यातल्या माणसांची मर्जी सांभाळावी लागते. सगळीकडून तिची अशी असहाय कोंडी होते. 'का म्हणून' कथेतील गार्गी आणि सौजन्य यांच्य लग्नानंतर मुलबाळ होत नाही, म्हणून त्याच्या वैद्यकिय तपासण्या केल्या जातात. गार्गी ही गर्भधारणेच्या बाबतीत वैद्यकीय तपासणीतून दोषी असल्याचे सिद्ध होते. घरातील सासू सासरे टाकून बोलून तिच्याशी तुटक वागतात, नवराही समजून घेत नाही. तिला घटस्फोट दिला जातो.गार्गीला आपल्याच माणसांकडून परकेपणाचा अनुभव आल्यानंतर ती खचून जात नाही, तर नातेसंबंधातील माणसापेक्षा स्वतःच्या अस्मिता व स्वाभिमान टिकवून ठेवण्यासाठी स्वावलंबी बनते.

**अरूणा सबाने** यांच्या 'बाईजी' कथेतील अंजूचे सासूसासरे कडक स्वभावाचे असतात. तिचा नवरा आई सांगेल तसे वागतो. घरात लहान दिराची चलती व नणंद कांगावेखोर असते. या सगळयाचे ऐकणं व करणं तिला त्रासदायक होते. ती गरोदर राहिल्यानंतर तिची सासू 'मुलगाच झाला पाहिजे' असा आग्रह करून मुलगी झाली तर जीवंत ठेवणार नसल्याचे बजावून सांगते. त्यामुळे ती घाबरून जाते व मुलगा होण्यासाठी देवाकडे प्रार्थना करते, परंतु तिला मुलगीच होते. घरातील सगळे नाराज होऊन तिचा छळ सुरू करतात आणि एकदिवस तिचा नवरा तिच्या मुलीसह तिला घराबाहेर काढतो. सासरा, दीर व नणंद ही बघ्याची भूमिका घेतात. तेव्हा 'असली माणसं देव जन्मालाच का घालतो' असा प्रश्न तिला पडतो.

**सीमा साखरे** यांच्या 'घालमेल' कथेत रमाबाईची विधवा आई तिच्या मावशीकड राहते. रमाबाई मोठी झाल्यावर तिचे एका दुष्ट माणसाशी लग्न होते. सासऱ्याची तिच्यावर वाईट नजर असते. सासूही तिच्याकडे संशयानं पाहते. नवऱ्याला सांगितलं तर तो विश्वास ठेवत नाही.ती गरोदर असताना तिचा सासरा सर्वांसमोर तिचा हात धरतो. हात झटकला तर पोटावर लाथ मारतो. ती विहिरीत उडी घेते. बाजूचा माणूस तिला वाचवतो. घरात खूप हंगामा होतो. घरातले लोक तिला घरात घेत नाही. रात्रभर ती अंगणात असते. सकाळी सासू खूप शिव्या देते. शेजारचे लोक वर्गणी गोळा करून तिला तिच्या आईकडे पोहचवून देतात. रमाला मुलगी होते. तिला शिकवते. ती शिक्षिका होते. ती सन्मानानं नोकरी करते आणि आईसाठीच जगते.

'चार भिंतीच्या आत' कथेतील गंगाबाईचा नवरा वाड्याला वारस हवा म्हणून दोन बायका करतो. चाळीशी ओलांडलेली गंगाबाई तिसरीचेही स्वागत करते. तिघेही सवती प्रेमाने राहतात. नवऱ्याने मुलगा होण्यासाठी चौथी बायको करू नये, म्हणून गंगाबाई तिसरीला समजून सांगते आणि घरच्या दिवाणजीपासून तिला गर्भधारणा करायला लावते. अशा या समजदार सवतीचे चित्रण या कथेत येते. 'झोपाळा' कथेतील आई वडील, मुले, मुली, भाऊ-भाऊ, बहिणी-बहिणी, दीर, वहिनी, नणंद, जावा ही सारी नात्याची माणसे आहेत.आशा ही भाऊची पत्नी आहे. ती चांगली, देखणी, सुंदर व प्रेमळ, कष्टाळू आहे, पण ती बंगल्याची मालकीण होईल, हा हेवा सासूसासरे सोडले तर दीर व नंदा यांना वाटतो. सासू, नणंद, जावेचा त्रास, मोठ्या दिराचे तिरस्काराचे बोलणे ती सहन करते. त्या सर्वांना बंगल्यावर तिचा हक्क बसू नये असे वाटते.

'आईच्या बांगड्या' या कथेत आई,वडील,मुले व सुना यांचे चित्रण केलेले आहे. स्वतःच्या आईकडे दुर्लक्ष करणाऱ्या स्वार्थी व सुखविलाशी मुलांचे आणि सासूशी चांगल्या न वागणाऱ्या सुना या नात्याच्या वाईट प्रतिमा डोळयासमोर उभ्या राहतात. 'पुण्यवान' कथेतील मुले शहरात शिकायला जातात. मात्र मुलांच्या वाईट वागण्याने धार्मिक प्रवृत्तीचे सन्माननीय सज्जन गृहस्थ असलेल्या वडिलांना त्रास होतो, तरी ते मुलासाठी मनाविरुद्धच्या गोष्टी सहन करतात. 'शह-काटशह' सासूच्या

अहंकारामुळे वैवाहिक जीवनात विघ्न निर्माण होतात. हेमंतची इच्छा नसताना त्याची आई त्याला त्याची पत्नी लिनाशी घटस्फोट घ्यायला सांगते. त्यानंतर हेमंतची वाईट अवस्था होते.त्याचे वडील लिनाकडे जातात. तिला आग्रह करून पुन्हा हेमंतशी लग्न करायला सांगतात. ती हेमंतसाठी लग्नास तयार होते.

**साधू मनिषा** यांच्या 'शिराणी' अंजूम सय्यदबरोबर लग्न करून हैद्राबाद सोडते व त्याच्यासोबत सौदी अरेबियात जाते. दोन मुलीच्या जन्मानंतर आजाराने त्याचे निधन होते. त्या मायलेकींचे जीवनसूत्र तिच्या दिराच्या हातात जाते. तिचा दीर वाईट स्वभावाचा, बायकोला मारणारा असतो. सुजानचे लग्न लवकर करायचे नाही, असा ती विचार करते. 'जाणीव' कथेतील महाविद्यालयात शिकणाऱ्या अनुराधाच्या गरीबीमुळे नातेवाईक फिरून पाहत नाही. तिचे चुलत मामा-मामी येतात. मामा समजुतीने वागतो, पण तिची मामी तिच्या गरिबीच्या परिस्थितीला नावे ठेवून अप्रत्यक्ष त्यांचा अपमान करते.'निरोप' कथेतील सुशिलास सासरी एकत्र कुटुंबात खूप काम करावी लागतात. तिला माहेरी पाठवत नाही. तिचे कोणी नातेवाईक तिच्याकडे आलेले सासरच्या मंडळींना आवडत नाही. तिचा नवरा तिला मारझोड करतो. तिची बालमैत्रिण तिला भेटायला येते तर तिला भेटत नाही. तिला केवळ मोलकरीण समजतात असे यातून दिसते.

➢ **निष्कर्ष**

१. नातेसंबंधांमध्ये आईचे स्थान व प्रतिमा ही उदात्त आहे, असे या लेखिकांच्या कथांमधून दिसून येते.
२. काही कथांमध्ये वडिलांची प्रतिमाही चांगली रेखाटलेली आहे.
३. सुनेला छळणाऱ्या आणि नातूचा आग्रह धरणाऱ्या सासवांच्या वाईट प्रतिमा या लेखिकांनी रेखांकित केलेल्या आहेत .
४. माहेरच्या रक्त संबंधातील आई, वडील, भाऊ व बहीण ही नाते लेखिकांनी विसंगतीपूर्ण स्वभावाची रेखाटलेली आहेत.
५ . सासू आणि सून यांच्या नात्यातील प्रेम व जिव्हाळा कमी असून भांडणे व मतभेदच अधिक असतात असे या लेखिकांच्या कथांमधून दिसून येतात
६ . सासरे जावई, व्याही व्याही, सासरे व सून तसेच सासू व जावई या नात्यातील पीळ प्रस्तुत लेखिकांनी उकलून दाखविलेले आढळत नाही.

➢ **संदर्भसूची**


१. अय्यर सुप्रिया, चांदणचुरा, प्रथम आवृत्ती, नागपूर, साहित्य प्रसार केंद्र ,२०१०
२. आशिरगडे माधुरी, आई शप्पथ आणि इतर कथा, प्रथमावृत्ती, नागपूर,आकांक्षा प्रकाशन , २०१५
३. इंगोले प्रतिमा, येळी माय, प्रथमावृत्ती, दर्यापूर, सोनल प्रकाशन, २००५
४. कारखानीस मोहना संजय, जाईचा मांडव, प्रथमावृत्ती, नवघर, डिंपल पब्लिकेशन, २०१५
५. कारखानीस मोहना, पैंजण, प्रथमावृत्ती, डिंपल पब्लिकेशन, मुंबई, २०१७
६. वळे सुनिता, उसवलेलं आभाळ, सुयोग प्रकाशन, प्रथमावृत्ती, वर्धा, २००५
७. बगे आशा, चंदन, प्रथमावृत्ती, नागपूर, विजय प्रकाशन, २००७
८. मंडलेकर कुमुद, जाग, प्रथमावृत्ती, नागपूर, सुशील प्रकाशन, २००२
९. मंडलेकर कुमुद, पडसाद, पहिली आवृत्ती, नागपूर, विजय प्रकाशन, २००४
१०. मंडलेकर कुमुद, प्रत्यय, पहिली आवृत्ती, नागपूर, विजय प्रकाशन, २००३
११. मार्डीकर मोहना, तिचं आकाश, प्रथमावृत्ती, नागपूर, विजय प्रकाशन, २०१५
१२. वानखेडे सुमती, जाणता अजाणता, प्रथम आवृत्ती, मेधा राजहंस, उन्मेष प्रकाशन, पुणे, २००५
१३. सबाने अरूणा, अनुबंध, आकांक्षा प्रकाशन, नागपूर, २००५
१४. साखरे सीमा, चार भिंतीच्या आत, प्रथमावृत्ती, नागपूर, सीमा प्रकाशन, २००७
१५. साधू मनिषा, डेल्टा, प्रथमावृत्ती, पुणे, संवेदना प्रकाशन, २००८